**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या प्रभावी कार्यान्वयासाठी राज्यातील विविध नियोजन प्राधिकरणातील कार्यालयांचे बळकटीकरण व आकृतीबंध, सेवाभरती तसेच प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, वेतनश्रेणी इ. बाबत सर्व विशेष नियोजन प्राधिकरणांना उक्त अधिनियमाच्या कलम १५४ अन्वये निदेश पारित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-५०२५/प्र.क्र.६८/नवि-२७**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
चौथा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
**दिनांक : ०४ एप्रिल, २०२५.**

**संदर्भ :- नगर विकास विभाग, शासन पत्र क्रमांक : टिपीएस-संकीर्ण-५०२५/प्र.क्र.६८/नवि-२७, दि.०६.११.२०२४ (व समक्रमांकाचे पत्र दि.१२.११.२०२४)**

## आदेश

***महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६***

**प्रस्तावना —**

ज्याअर्थी, राज्यातील विविध नियोजन प्राधिकरणातील कार्यालयाचे बळकटीकरण करण्याच्या अनुषंगाने यापूर्वी मा.अपर मुख्य सचिव (नवि-१) यांच्या अध्यक्षतेखाली विविध नियोजन प्राधिकरणातील अधिकाऱ्यांसमवेत वेळोवेळी बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, सदरील बैठकामध्ये विविध नियोजन प्राधिकरणामधील कामकाजाचे स्वरुप, कार्यालयाच्या बळकटीकरणाच्या अनुषंगाने आकृतीबंध, सेवाभरतीबाबतची माहिती, प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, वेतनश्रेणी इ. मुद्यांच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, विविध नियोजन प्राधिकरणातील पदांची निर्मिती प्राधिकरण स्तरावर झालेली असल्याने, पदांच्या कार्य व कर्तव्यांबाबत, जबाबदाऱ्यांबाबत एकसमानता नसल्याने ; या बाबी विचारात घेता विविध नियोजन प्राधिकरणातील या सर्व बाबींबाबत एकसमानता आणणे, बळकटीकरण व कार्य कर्तव्यांची निश्चितीबाबत शासनाचे मत झाले आहे.

त्याअर्थी, राज्यातील विविध नियोजन प्राधिकरणातील कार्यालयांमध्ये एकसमान कार्यपध्दती निश्चित करण्याच्या दृष्टीकोनातून सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम



नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32. सत्यमेव जयते

१९६६ चे कलम १५४ अन्वये राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना आवश्यक त्या सूचना / निदेश देण्याची आवश्यकता होती;

सबब प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या प्रभावी कार्यान्वयनासाठी तसेच सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून उक्त अधिनियमाचे **कलम १५४** अन्वये प्राप्त अधिकारात शासन खालीलप्रमाणे निदेश देत आहे.

## शासन निदेश

(१) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ कायद्यानुसार विहित कार्ये पार पाडण्यासाठी विशेष नियोजन प्राधिकरणांमध्ये आवश्यक असलेला व अस्तित्वात असलेला अधिकारी / कर्मचारी वृंद यांचा आकृतिबंध नियोजन प्राधिकरणांनी खालील सविस्तर माहितीसह १ महिन्याच्या आत शासनास सादर करावा.

**(अ)** सदर आकृतिबंधामधील नमूद संवर्गनिहाय पदांबरोबर त्यांचे सेवाप्रवेश नियम, शैक्षणिक पात्रता व निवड प्रक्रिया, तांत्रिक अर्हता (आवश्यकता असल्यास अनुभव इ.)

**(ब)** नियोजनासंबंधी अधिकारी / कर्मचारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या.

**(क)** नियोजन प्राधिकरणांनी आकृतिबंधामधील प्रतिनियुक्तीने भरावयाचे पदे.

**(ड)** विविध नियोजन प्राधिकरणास आकृतीबंधामध्ये प्रस्तावित कंत्राटी कर्मचारी.

**(इ)** कायद्याद्वारे विहित केलेली काही कार्ये कर्मचाऱ्याऐवजी निविदेद्वारे निवडलेल्या कंत्राटी किंवा त्रयस्थ संस्थांकडून करणे प्रायोजित असल्यास त्याबद्दलची माहिती.

(२) राज्य शासनाने जशाचा तसा किंवा काही बदलांसह आकृतिबंध मंजूर केल्यानंतर संबंधित विशेष नियोजन प्राधिकरणांनी ६ महिन्यांच्या आत मंजूरीप्रमाणे अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील, तसेच शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय विविध नियोजन प्राधिकरणांच्या आकृतीबंधात बदल करता येणार नाही. कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत नियोजन प्राधिकरण म्हणून करावयाची कोणतीही कार्यवाही मंजूर आकृतीबंधापेक्षा व्यतिरिक्त पदावर असलेले अधिकारी/कर्मचारी मार्फत करता येणार नाही.

(३) विशेष नियोजन प्राधिकरणात प्रशिक्षण, इंटर्नशिप आणि इतर भूमिकांसाठी प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांसोबत करार करण्यासही प्रोत्साहन देण्यात यावे. विशेष नियोजन प्राधिकरणातील कर्मचारी यांच्या कौशल्यवृध्दीकरिता तांत्रिक क्षमता वाढवणारे अभ्यासक्रम, क्षेत्रभेटी आणि इतर मानव संसाधन विकास (Human Resource Deveopmnent) सुधारणा पद्धती संबंधी आवश्यक कार्यवाही तत्परतेने करावी.

अनेक शहरे किंवा संस्थामध्ये अनुभवाची देवाण - घेवाण इ. साठी समान कार्य करणाऱ्या संस्थाबरोबर सामंजस्य करार अस्तित्वात आहेत. विशेष नियोजन प्राधिकरणांनी अशा समान काम करणाऱ्या संस्थांचा सक्रिय सहभाग घेवून त्यांच्या अनुभवांची देवाण - घेवाण करण्यास प्रोत्साहित करण्याबाबत उपययोजना करावी. उपरोक्त प्रयोजनाकरिता प्राधिकरणाकडील एकूण विकास शुल्कापैकी २% शुल्क नियोजन प्राधिकरणातील नगर रचना,

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. सत्यमेव जयते

अधिकारी / कर्मचारी यांच्या इंटर्नशिप, प्रशिक्षण, लायब्ररी, प्रशिक्षण भेटी, क्षेत्र भेटी, इतर साहित्य आणि क्षमता वाढीसाठी राखून ठेवण्यात यावे.

(४) सदरचे निदेश हे तात्काळ लागू होतील.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.*

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32. सत्यमेव जयते

(डॉ.प्रतिभा भदाणे)
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत : - आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
२. महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.
३. महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर.
४. महानगर आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर.
५. महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
६. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (मर्या.), मुंबई.
७. अध्यक्ष, मुंबई बंदर प्राधिकरण, मुंबई.
८. अध्यक्ष, जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण, मुंबई.
९. सचिव, धारावी पुनर्विकास प्रकल्प झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई.
११. व्यवस्थापकीय संचालक, सिडको.
१२. संचालक तथा मुख्य नियोजक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मर्या., मुंबई.
१३. आयुक्त, सर्व महानगरपालिका.
१४. मुख्य नियोजनकार, मुंबई महानगर विकास प्राधिकरण, मुंबई.
१५. संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.
१६. सह / उप संचालक, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण, मुंबई/पुणे/ठाणे.

**प्रत माहितीस्तव :-**

१) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

९) अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०) प्रधान सचिव, (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

११) संचालक (नगर रचना) तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

/- सदरचे निर्देश नगर रचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

१३) सर्व विभागीय सहसंचालक, नगर रचना. नगर रचना कोकण/ छत्रपती संभाजीनगर/ पुणे / नाशिक / नागपूर / अमरावती विभाग.

१४) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई.

/- सोबतचे निदेश महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रामध्ये राज्यस्तरावर प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती नगर विकास विभागास व वरील सर्व कार्यालयांना पाठवाव्यात.

१५) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सदर निदेश विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावेत.

१६) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सदर निदेश शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१७) निवड नस्ती, कार्यासन (नवि-१३).

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32.